माहे एप्रिल ते जून २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित १५६६ व माहे जुलै २०२०ते डिसेंबर २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १२६६७अशा एकूण १४२३३ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी - मतदार यादीचा कार्यक्रम.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०००३२.
दिनांक - २० नोव्हेंबर २०२०

प्रति,
जिल्हाधिकारी सर्व
(मुंबई *शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय: माहे एप्रिल ते जून २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित १५६६व माहे जुलै २०२०ते डिसेंबर २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १२६६७अशा एकूण १४२३३ग्राम पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम....**

**संदर्भ:** १.आयोगाचा समक्रमांकाचा दिनांक ०५/०२/२०२० चा मतदार यादी कार्यक्रम.
२.राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक २४/०२/२०२० च्या आदेशान्वये दिलेला निवडणूक कार्यक्रम व समक्रमांकाचे दि. १२/०३/२०२० चे पत्र.
३.राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा२०२०/प्र.क्र.७/का.०५, दिनांक १७ मार्च २०२०चे पत्र.
४.आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि/२०१९प्र.क्र.१३/का.०८, दि.२९/११/२०१९ चे प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम आदेश व समक्रमांकाचे दि.२०/१०/२०२० चे पत्र.
५.राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० चे मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम रद्द केल्याचे आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी, माहे एप्रिल २०२०ते जून २०२०या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या १५६६ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी दि.०५/०२/२०२० रोजीच्या आदेशान्वये मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात आला होता आणि दि.२४/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येत होता आणि मतदान दि.३१/३/२०२० रोजी होणार होते;

आणि ज्याअर्थी, मार्च २०२०दरम्यान कोवीड १९ या साथीच्या आजाराच्या संसर्गाची गंभीर परिस्थिती उदभवल्याने चालू असलेली निवडणूक प्रक्रीया पुढे राबविणे जनहिताचे नसल्याने, आयोगाने जाणीवपूर्वक निर्णय घेऊन दिनांक १७/०३/२०२० रोजी चालू असलेली निवडणूक प्रक्रीया आहे त्या टप्प्यावर स्थगित केली;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर केंद्र व राज्य शासनाने सर्व परिस्थितीचा आढावा घेत प्रथम संपूर्ण लॉकडाउन जाहिर केले आणि त्यानंतर कोवीड १९ या साथीच्या आजाराच्या परिस्थितीचा आढावा घेत टप्प्या टप्प्याने लॉकडाउन मध्ये शिथिलता जाहिर केली.

आणि ज्याअर्थी, या १५६६ग्राम पंचायतीतील नामनिर्देशन छाननीची प्रक्रीया विविध स्तरावर स्थगित झाली ,आणि कोरोना संसर्गाच्या दरम्यान ८महिन्याचा काळ उलटून गेला असून या १५६६ गावांमध्ये कोरोनामुळे झालेल्या घडामोडी विचारात घेता या सर्व ठिकाणी नव्याने निवडणूक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, या १५६६ग्रामपंचायतींच्या निवडणूक प्रक्रीयेवरील स्थगिती उठवून निवडणूक घेण्याचा निर्णय घेताना असे निदर्शनास आले की,या ग्रामपंचायतीच्या मतदार याद्या दिनांक ३१/०१/२०२० पर्यंत अद्यावत केलेल्या व अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादी वरून तयार करण्यात आल्या होत्या.तसेच सदर विधानसभा मतदार यादी दि.१जानेवारी,२०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत होती व भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी,२०२०या अर्हता दिनांकावर आधारीत अद्यावत मतदार यादी दि.२५/९/२०२० रोजी प्रसिध्द केलेली आहे.त्यामुळे दिनांक ०१/०१/२०२० या अर्हता दिनांकावर समाविष्ट झालेले मतदार यादीतील सर्व मतदारांना मतदान करण्याची तसेच निवडणूक लढविण्याची संधी मिळणे हे लोकशाहीच्या मुलभूत तत्वांनुसार आवश्यक आहे. अशा बदललेल्या परिस्थितीत दिनांक ०१/०१/२०१९ अर्हता दिनांकावर आधारीत जुनी मतदार यादी उपरोक्त स्थगित ग्रामपंचायत निवडणूकांसाठी वापरणे

योग्य होणार नसल्याने आयोगाच्या दिनांक १९ नोव्हेंबर २०२० च्या आदेशान्वये १५६६ ग्रामपंचायतींसाठी राबविण्यात आलेला निवडणूकीचा कार्यक्रम व मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, या निवडणूकांसाठी मतदार यादी प्रक्रीया व निवडणूकी प्रक्रिया नव्याने राबविणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, माहे जुलै २०२०ते डिसेंबर २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १२६६७ग्रामपंचायतींची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली असून या ग्राम पंचायतींची सार्वत्रिक निवडणूक घेण्यासाठी देखील मतदार यादी तयार करणे क्रमप्राप्त आहे.

आणि ज्याअर्थी, **भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक ०१जानेवारी २०२०या अर्हता दिनांकाची, अंतिम मतदार यादी दिनांक २५सप्टेंबर २०२०रोजी प्रसिध्द झालेली आहे.**

त्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३)मधील कलम १०अ पोटकलम (४)मधील अधिकारांचा वापर करून सदर निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणेसाठी प्रभाग निहाय मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

## आदेश

१. मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती-

**माहे एप्रिल ते जून २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित १५६६व माहे जुलै २०२०ते डिसेंबर २०२०या कालावधीत मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापित सुमारे १२६६७अशा एकूण १४२३३ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी दिनांक २५ सप्टेंबर २०२०रोजी प्रसिध्द करण्यात आलेली महाराष्ट्र विधान सभेची मतदार यादी वापरण्यात यावी.**

**प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर त्या ग्रामपंचायतीच्या नावासह (मराठी/इंग्रजी) प्रसिध्दी अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे तात्काळ न चुकता सादर करण्यात यावा.**

२. वरील मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | शुक्रवार दि.२५/०९/२०२० |
| १. प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि.०१/१२/२०२० |
| २. हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार दि.०१/१२/२०२० ते सोमवार दि.०७/१२/२०२० पर्यंत |
| ३. प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी | गुरुवार दि.१०/१२/२०२० |

प्रसिध्द करणे.

**३. प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे–**

प्रभाग निहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी.

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या अधिक त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्राम पंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दी बाहेरील मतदार त्या मध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र. मनपा/रानिआ२००७/ प्र.क्र.०६/का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्याबाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/ मनपा२०१०/प्र.क्र.४/का-५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधान सभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादी मध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादीं बाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. ( आयोगाचे क्र. रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्पकक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

**४. प्रारूप प्रभाग निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभाग निहाय मतदार यादीवर मतदार/नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारुप मतदार यादीला दि.०१/१२/२०२० रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

**५. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभाग निहाय मतदार यादी अंतिम करणे.**

५.१ दि.०१/१२/२०२० ते दि.०७/१२/२०२० पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभाग निहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

(iii) संबंधित प्रभागातील विधान सभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादी मध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभाग निहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

५.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरील प्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात, जेणे करून पुढील काळात या बाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

६. **प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दिनांक १०/१२/२०२० रोजी खाली नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

प्रारूप व अंतिम प्रभाग निहाय मतदार यादीस खालील प्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

अ) ग्रामपंचायत, तलाठीसजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकावर
ब) स्थानिक वृत्तपत्रे
क) स्थानिक केबल टि.व्ही.

७. **ही यादी ऑनलाईन पध्दतीने आयोगाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीतून करावयाची आहे. सदर ऑनलाईन पध्दतीने मतदार यादी करताना अडचणी उदभवल्यास, पारंपारिक पध्दतीने मतदार यादी करण्याची मुभा राहिल.**

८. वरील सूचनां प्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या **मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिन चूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.** (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि .२४/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)

९. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखादया ग्राम पंचायतींबाबत **न्यायालयाने सदर कार्यक्रमास स्थगिती दिली** अथवा **अनर्हते विरोधातील अपिला संदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१०. निवडणूका असलेल्या ग्राम पंचायतींची संख्या विचारात घेता, मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्व तयारी संदर्भात जिल्ह्याच्या **मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने**

**आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.** आपल्या कामाचा आढावा मा.आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळो वेळी घेण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

११. **मतदार** यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

१२. **सदर प्रभाग निहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सोबत: परिशिष्ट**

**प्रत-**

१.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यकते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

३.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

४.संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

मतदार यादी कार्यक्रमा संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता व्यावी.

६.संगणकीकरण शाखा,राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

७.कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धते संदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

८.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

९.राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१०.निवड नस्ती.